1

४५

फिर्याद

लाप्रवि वाशिम
दिनांक :–०४/०९/२०२६

नांव :– सुलभा प्रल्हाद राऊत, वय –४३ वर्षे, व्यवसाय– नोकरी, पद– पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम, मो.नं. ९९२२०६११२३

मी आज रोजी सरकारतर्फे समक्ष फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंध विभाग वाशिम येथे पोलीस निरीक्षक म्हणुन १६/०६/२०२६ पासुन कार्यरत आहे. दि. ०३/०९/२०२६ रोजी लाप्रवि कार्यालय वाशिम येथे कर्तव्यावर हजर असतांना तक्रारदार यांनी फोन व्दारे त्याचे नावा युनुसखान गफ्फार खान वय ५३ वर्ष, राहणार वार्ड क्र. २ गवळीपुरा मंगरुळपीर ता. मंगरुळपीर जि. वाशिम असे सांगुन लाच मागणी तक्रार अल्याबाबत थोडक्यात माहिती देवुन तक्रार नोंदविणेकामी व कारवाई करणेकामी मंगरुळपीर येण्याची विनती केल्याने आम्ही मा.गटविकास अधिकारी, पंचायत समिती वाशिम यांच्या कार्यालयातुन दोन सरकारी पंच क्र.१) श्री.रवी भास्कर गाडे व २) श्रीमती सुरेखा पंजाबराव तायडे असे प्राप्त केले. दोन्ही पंच व लाप्रवि स्टाफसह मंगरुळपीर येथे पोहचुन दोन्ही पंचांना तक्रारदार यांचा परिचय करून दिला. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना तक्रार लिहुन देण्यास सांगीतले असता तक्रारदार यांनी तक्रार लिहुन आणली असल्याचे सांगुन तक्रार कथन केली. तक्रारदार यांनी कथन केलेली व त्यांनी लिहुन आणलेली तक्रार पुढीलप्रमाणे “मी उपरोक्त अर्जदार मंगरुळपीर येथे राहत असुन मजुरीचे काम करतो. दिनांक २५.०७.२०२६ रोजी माझा मुलगा नामे समीर युनुस खान वय २५ वर्ष याचे फिर्यादी वरुन पोलीस स्टेशन मंगरुळपीर येथे अप.नं.५२७/२०२६ कलम ११८ (१), २९६, ३५१ (२), ३५१ (३), ३ (५) BNS प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्हयाचा तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल सुनिल ताले यांचे कडे होता. ते बिट जमादार आहेत. त्यांनी माझ्या कडून ज्या दिवशी गुन्हा दाखल झाला त्याच दिवशी दुपारी २ वाजताच्या सुमारास मला बिट जमादार ताले यांनी स्पॉट पंचनामा करायचा आहे असे सांगुन माझ्या कडुन तिन हजार रूपये घेतले आणि मला असे म्हटले की पंचनाम्यासाठी पैशे लागत असतात. त्यातील दोन हजार रूपये बिट जमादार ताले यांनी त्यांचे कडे घेतले व एक हजार रूपये मला त्यांचे सोबत असलेला खाजगी इसम नामे विजय चंदु चव्हाण याला द्याले सांगीतले . मला असे वाटले की पंचनाम्यासाठी पैसे द्यावे लागतात म्हणुन मी नाइलाजाने पैसे दिले. मागील आठवडयात तारीख मला आठवत नाही, ताले जमादार व त्यांचे सोबतचा खाजगी इसम विजय चंदु चव्हाण हे दोघे जण माझ्या घरी आले व मला ताले जमादार म्हणाले की, तुमच्या मुलाचे फिर्यादी वरुन जो गुन्हा दाखल झाला आहे त्याचे काम पुर्ण झाले आहेत. चार्जशिटच्या झेरॉक्स काढण्यासाठी २०००/ रूपये तुम्ही विजय कडे देवुन टाका वरुन मी माझ्या घराचे बांधकाम चालु असल्याने व मुलाचे लग्न असल्याने मी सध्या देवु शकत नाही असे म्हटले. त्यावर ताले जमादार यांनी पुढच्या आठवडयात विजय कडे दया असे म्हटले व दोघे निघुन गेले. पर्वा दिनांक ०१.०९.२०२६ रोजी दुपारी ०१.३० वा. चे सुमारास ताले जमादार यांचे कडील खाजगी इसम विजय चंदु चव्हाण माझ्या घरी आला व मला म्हणाला की, ताले जमादार यांचे दोन २०००/ रूपये तुम्ही दिले नाहीत. मी त्याला म्हणालो की, सध्या माझ्या कडे नाहीत माझ्या जवळ पैसे आल्यावर मी ताले जमादार यांच्या कडे देतो. आज दिनांक ०३.०९.२०२६ रोजी मला ताले जमादार यांचे कडील खाजगी इसम विजय चव्हाण यांचे माध्यमातुन पैश्यासाठी निरोप आला. ताले जमादार मला चार्जशिटची झेरॉक्स काढण्यासाठीचे जे २०००/ रूपये मागत आहेत ते लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाल्याने मी आपल्याकडे त्याबद्दल लेखी तक्रार देत आहे. सदर २०००/ रूपयाची लाच ताले जमादार व त्यांचे सोबत असलेला खाजगी ईसम नामे विजय चंदु चव्हाण या दोघांना देण्याची माझी ईच्छा नाही. ताले जमादार व माझ्या मध्ये कोणताही उसनवारीचा व्यवहार झालेला नाही तसेच आमच्या दोघांची कोणतीही आपसी दुश्मनी नाही. तरी बिट जमादार हेड कॉन्स्टेबल सुनिल ताले पोलीस स्टेशन मंगरुळपीर व खाजगी ईसम विजय चंदु चव्हाण यांचे वर लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाने कार्यवाही व्हावी ही विनंती.” सदर तक्रारीवर तक्रारदार यांनी स्वत: व दोन्ही पंचानी तसेच समक्ष म्हणुन मी सुध्दा सही केली. आम्ही तक्रारदार यांना आलोसे पोलीस अंमलदार सुनिल ताले व आरोपी खाजगी इसम विजय चव्हाण हे लाच मागणी करतात किवा नाही? हे पडताळणी करणे आवश्यक असल्याचे सांगीतले. तक्रारदार यांना आलोसे पोलीस अंमलदार सुनिल ताले व आरोपी खाजगी इसम विजय चव्हाण हे कोठे भेटतील अशी विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगीतले की, आलोसे पोलीस अंमलदार सुनिल ताले व आरोपी खाजगी इसम विजय चव्हाण हे पोलीस स्टेशन मंगरुळपीर जि. वाशिम येथे भेटतील.

स्टे.डा. अंमलदार
कलम ७,७A
भ्र.प्र.अधि.
१९८८ सह
कलम २६२,
२८९ BNS
प्रमाणे गुन्हा
दाखल करावा
[signature]
PSI

रजा क्र.
05/26
04/1491
04/9/26

तक्रारदार यांना आलोसे पोलीस अंमलदार सुनिल ताले व आरोपी खाजगी इसम विजय चव्हाण यांनी दि. ०१/०९/२०२६ व दि.०३/०९/२०२६ रोजी तक्रारदार यांना त्यांचा मुलगा नामे समीर युनुस खान वय २५ वर्ष याचे फिर्यादी वरुन पोलीस स्टेशन मंगरुळपीर येथे अप.नं.५२७/२०२६ कलम ११८ (१), २९६, ३५१ (२), ३५१ (३), ३ (५) **BNS** प्रमाणे दाखल झालेल्या गुन्हयाचे चार्जशीट झेरॉक्स काढण्यासाठी २,००० रुपया**ची** लाचेची मागणी करतात किंवा कसे? याबाबतची पडताळणी करणे आवश्यक आहे. आलोसे पोलीस अंमलदार सुनिल ताले व आरोपी खाजगी इसम विजय चव्हाण यांची आज दि.०३/०९/२०२६ रोजी पोलीस स्टेशन मंगरुळपीर जि.वाशिम येथे भेट होणार असल्याने सदरची तक्रार पडताळणी कार्यवाही दि.०३/०९/२०२६ रोजी करण्याचे सर्वानुमते ठरले. तसेच पंच क्र. ०१ यांना तक्रारदार यांचे सोबत पाठविण्यात येणार असल्याचे आम्ही सांगीतले. सदरचा पडताळणीपुर्व पंचनामा पुर्ण करण्यात आला. तसेच तक्रारदार यांचे शर्टाचे आतुन व्हाईस रेकॉडर लावुन तक्रारदार व पंच क्र.०१ यांना तक्रारदार यांच्या खाजगी दुचाकीने आलोसे पोलीस अंमलदार सुनिल ताले व आरोपी खाजगी इसम विजय चव्हाण यांची भेट घेणेकामी पोलीस स्टेशन मंगरुळपीर येथे १४.३२ वा. चे सुमारास रवाना केले. आम्ही व पंच क्र.२ तसेच स्टाफ असे शेलु ते मंगरुळपीर रोड वरील ग्राम शाहापुर येथील मनोज गॅरेज च्या मागील मोकळया जागी येथे थांबून राहिलो. १४.५१ वा. चे दरम्यान तक्रारदार व पंच क्र.१ हे पंच यांचे खाजगी वाहनाने लाप्रवि थांबुन असलेल्या ठिकाणी परत आले. पंच क्र.०१ व पंच क्र०२ यांच्या समक्ष तक्रारदार यांना घडलेल्या हकीकत बाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगीतले की, तक्रारदार आरोपी खाजगी इसम विजय चव्हाण व आलोसे सुनिल ताले यांच्या मध्ये कामा संबंधी बोलणी होवुन पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार व आलोसे पोलीस अंमलदार सुनिल ताले व आरोपी खाजगी इसम विजय चव्हाण यांचेत झालेल्या संभाषणा नुसार आलोसे पोलीस अंमलदार सुनिल ताले व आरोपी खाजगी इसम विजय चव्हाण यांनी तक्रारदार यांना त्यांचा मुलगा नामे समीर युनुस खान वय २५ वर्ष याचे फिर्यादी वरुन पोलीस स्टेशन मंगरुळपीर येथे अप.नं.५२७/२०२६ कलम ११८ (१), २९६, ३५१ (२), ३५१ (३), ३ (५) **BNS** प्रमाणे दाखल झालेल्या गुन्हयाचे चार्जशीट झेरॉक्स काढण्यासाठी २,००० रुपया**ची** लाच मागणी करुन आज रोजी स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने सापळा कारवाई आज दिनांक ०३/०९/२०२६ रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले आहे.

दि.०३/०९/२०२६ रोजी सापळा कारवाई ही पोलीस स्टेशन मंगरुळपीर जि.वाशिम येथे करण्याचे ठरल्याने सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार व पंचाना सुचना दिल्या. तसेच तक्रादार याना लाच रक्कम स्विकारल्याचा ईशारा म्हणुन त्यांच्या डोळयावरील चष्मा काढुन त्यांच्या शर्ट च्या खिशात ठेवण्याचा इशारा सांगीतला. तक्रारदार यांना लाच रक्कम २,०००/— रुपये हजर करण्यास सांगीतले असता तक्रारदार यांनी त्यांच्याकडे २,०००/— रुपये रक्कम पंचासमक्ष हजर केली. सदर लाच रक्कमेस अॅथ्रॉसिन पावडर लावली व तक्रारदार यांचेकडे लाच रक्कम देउन व्हाईस रेकॉर्डर त्यांचे शर्टाचे आतुन बनियानला लावला व लघु पाटबंधारे विभाग वाशिम येथे १५:२३ वा रवाना केले. सापळा पथक सुदधा पोलीस स्टेशन मंगरुळपीर जि. वाशिम येथे रवाना होउन तेथे दबा धरुन बसले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक सुलभा राऊत यांच्या सुचनेप्रमाणे तक्रारदार व पंच क्र.(०१) श्री.रवी भास्कर गाडे असे तक्रारदार यांच्या खाजगी मोटार सायकल क्रमांक MH-37-A-4094 ने रवाना होवुन पोलीस स्टेशन मंगरुळपीर येथे पोहचणे पुर्वी पो नि राऊत पोहवा विनोद मारकंडे, पोहवा समाधान मोघाड व पोहवा मुबश्शीर शेख व पंच क्र.(०२) श्रीमती सुरेखा पंजाबराव तायडे असे शासकीय वाहनाने पोहचुन पोलीस निरीक्षक सुलभा राऊत, लाप्रवि वाशिम यांनी सापळा कार्यवाहीचे आयोजन केले. आम्ही पोलीस स्टेशन मंगरुळपीर येथे आजुबाजुला सापळा लावुन दबा धरून थांबुन राहिलो, तक्रारदार व पंच क्र.(०१) असे मोटार सायकलने येतांना दिसले तक्रादार यांनी पोलीस स्टेशनच्या बाहेरच पंच क्र(०१) यांना दुचाकीवरुन उतरुन दिले व तक्रारदार हे पोलीस स्टेशनच्या आवारात गाडी लावुन पोलीस स्टेशन च्या आवारात असलेल्या मंदिराकडे गेले तेथे जावुन त्यांनी फोन लावला काही वेळाने खाजगी इसम विजय चव्हाण तेथे आला त्यानंतर आलोसे सुनिल ताले हे सुध्दा तेथे आले तक्रारदार व त्यांच्यामध्ये बोलणे होवुन तक्रारदार यांनी लाच रक्कम खाजगी इसम यांच्या कडे दिली व पुर्व नियोजीत इशारा म्हणुन डोळयावरील चष्मा काढुन शर्टाचे खिशात ठेवला लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा दिला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक सुलभा राऊत यांच्या इशारावर सर्व सापळा पथक आलोसे पोलीस अंमलदार सुनिल ताले पोलीस स्टेशन मंगरुळपीर जि. वाशिम व आरोपी खाजगी इसम विजय चव्हाण यांना ताब्यात घेण्यासाठी पुढे सरसावले असता तक्रारदार यांचे हावभाव व हालचाल पाहुन दोन्ही आरोपीतांना संशय आल्याने त्यांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला परंतु सापळा पथकाने आरोपी खाजगी इसम विजय चव्हाण यास ताब्यात घेवुन त्यांच्याकडुन लाच रक्कम

हस्तगत केली. आलोसे पोलीस अंमलदार सुनिल ताले पोलीस स्टेशन मंगरुळपीर जि. वाशिम यांनी कायदेशीर अटकेला मज्जाव करुन त्यांच्या ताब्यातील चारचाकी वाहनात बसुन वाहन भरधाव वेगाने सापळा पथकाच्या दिशेने आणुन बेदरकारपणे सार्वजनीक रस्त्यावरुन चालवुन पळुन गेल्याने त्यांना ताब्यात घेता आले नाही.

आरोपी लोकसेवक १) सुनिल ताले, व्यवसाय– नोकरी पोलीस हवालदार पो.स्टे मंगरूळपीर रा.कारंजा ता. कारंजा जि.वाशिम व २)आरोपी खाजगी ईसम विजय चंदु चव्हाण वय ३४ वर्षे व्यवसाय मजुरी रा.गिंभा ता.मंगरूळपीर जि.वाशिम यांनी तक्रारदार यांना त्यांचा मुलगा नामे समीर युनुस खान वय २५ वर्ष याचे फिर्यादी वरुन पोलीस स्टेशन मंगरुळपीर येथे अप.नं.५२७/२०२६ कलम ११८ (१), २९६, ३५१ (२), ३५१ (३), ३ (५) BNS प्रमाणे दाखल झालेल्या गुन्हयाचे चार्जशीट झेरॉक्स काढण्यासाठी २,००० रुपयाची लाच मागणी करुन तडजोडी अंती २०००/– रु लाच मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले. दि.०३/०९/२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान १५:२३ वा. ते १५:३९ वा. चे दरम्यान २०००/– रु लाच रक्कम पंचासमक्ष पोलीस स्टेशन आवारात आरोपी खाजगी ईसम विजय चंदु चव्हाण वय ३४ वर्षे व्यवसाय मजुरी रा.गिंभा ता.मंगरूळपीर जि.वाशिम यांनी आलोसे पोलीस हवालदार सुनिल ताले यांच्या वतीने लाच रक्कम स्विकारल्याने त्यांचे हे कृत्य ७ A भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे होते. तसेच आलोसे सुनिल ताले, व्यवसाय– नोकरी पोलीस हवालदार पो.स्टे मंगरूळपीर रा.कारंजा ता. कारंजा जि.वाशिम यांना पडताळणी व यशस्वी सापळा कारवाई दरम्यान लाच मागणी करुन यशस्वी सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांच्या हालचालीवर संशय असल्याने यांनी अटक टाळण्याच्या उद्देशाने अटक करण्यासाठी त्यांच्या कडे येणाऱ्या सापळा पथकाच्या अंगावर चारचाकी गाडी आणुन पळ काढला त्यांचे वरील कृत्य भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ व बिएनएस कलम २६२ व २८१ प्रमाणे होत असल्याने माझी त्यांचे विरुध्द सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद आहे.

सही

(सुलभा प्रल्हाद राऊत)
पोलीस निरीक्षक,ला.प्र.वि.वाशिम.